.nagpur

# NMC e NEWS LETTER

सप्टेंबर २०१९

/nmcngp/ /ngpnmc/ www.nmcnagpur.gov.in/ http://news.nmcnagpur.org/

## थोडक्यात...

### रमाई घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना धनादेश वाटप

सभापती तारा (लक्ष्मी) यादव यांनी घेतला प्रलंबित कामाचा आढावा



महाराष्ट्र शासनाच्या महत्वकांक्षी अशा योजनेतील एक म्हणजे रमाई घरकुल योजना. या योजनेतील आसीनगर झोनमधील लाभार्थ्यांना धनादेशाचे वाटप सोमवारी आयोजित गलिच्छ वस्ती निर्मूलन समितीच्या आढावा बैठकीमध्ये करण्यात आले. यावेळी सभापती तारा (लक्ष्मी) यादव, सदस्या भावना लोणारे, अनिल गेंडरे, माधुरी ठाकरे, सहायक आयुक्त (कर) मिलिंद मेश्राम, कार्यकारी अभियंता राजू रहाटे, गिरिश वासनिक, श्री रंगारी, लीना बुधे यांच्यासह स्लम विभागाचे कर्मचारी व अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. या बैठकीमध्ये रमाई घरकुल योजनेच्या कामकाजाचा आढावा सभापतींनी घेतला. कागदपत्रांच्या अभावामुळे प्रक्रिया करण्यास उशीर होतो आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. आसीनगर झोनमधील नऊ लाभार्थ्यांना यावेळी सभापती तारा (लक्ष्मी) यादव यांच्या हस्ते धनादेश वितरित करण्यात आला. यामध्ये भाऊराव जांभूळकर, अजय कोकाटे, राकेश रामटेके, श्री.मेश्राम, श्री.डोंगरे यांचा समावेश आहे. कामे लवकरात लवकर पूर्ण करून योजनेचा लाभ नागरिकांपर्यंत पोहचेल, यासाठी प्रयत्न करा, असे निर्देश सभापती तारा (लक्ष्मी) यादव यांनी दिले.

### नवरात्र आणि गरबा उत्सवातून करणार प्लास्टिकबंदीबाबत जनजागृती

स्वच्छ भारत अभियान तयारीचा घेतला आढावा: आयुक्त अभिजीत बांगर

पुढील काही दिवसांत सुरू होणारा नवरात्र उत्सव आणि त्यानिमित्त शहरात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणावर करण्यात येणारे गरब्याचे आयोजन लक्षात घेता तेथे एकत्रित होणाऱ्या नागरिकांना नागपूर महानगरपालिका प्लास्टिकबंदीचा संदेश देणार आहे. प्लास्टिकबंदीबाबत जनजागृती करत नागरिकांनी यासाठी स्वत: पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात येणार असल्याची माहिती मनपा आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिली. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या स्वच्छता सप्ताहासंदर्भात बोलताना ते म्हणाले, झोनस्तरावर जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात यावे. केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत नागपूर शहराची निवड देशातील निवडक शहरांमध्ये करण्यात आली आहे. या शहरांमध्ये प्लास्टिक कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी २ ऑक्टोबरला 'प्लॉग रन'चे आयोजन करण्याचे प्रस्तावित असल्याचे त्यांनी सांगितले. नागपूर महानगरपालिका परिसराला 'सिंगल यूज प्लास्टिक मुक्त' करण्याचे निर्देश देत अन्य सरकारी कार्यालयांनाही 'सिंगल यूज प्लास्टिक'चा उपयोग बंद करून अभियानात सहभागी होण्याचे आवाहन आयुक्त अभिजीत बांगर यांनी यावेळी केले.प्लास्टिकऐवजी पर्यायी व्यवस्थेला प्रोत्साहन देण्याची सुचवित आयुक्त अभिजीत बांगर म्हणाले, यासाठी प्लास्टिकला पर्याय असलेल्या वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी महिला बचत गटांना प्रोत्साहित करायला हवे. या बचत गटांना शॉपिंग कॉम्प्लेक्स आणि मॉलशी जोडले जाईल जेणेकरून उत्पादनाची विक्री होईल आणि प्लास्टिकचा उपयोग बंद करणे शक्य होईल.

### खड्डे बुजविण्याचे कार्य युद्धपातळीवर करा!

आयुक्त अभिजीत बांगर यांचे निर्देश : कार्य प्रगतीची केली आकस्मिक पाहणी

नागपूर शहरातील रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांचा विषय मनपा आयुक्तांनी गांभीर्याने घेतला असून यासाठी गेल्या काही दिवसांपासून त्यांनी अधिकाऱ्यांच्या बैठका घेत खड्ड्यांना बुजविण्यासंदर्भात कडक निर्देश दिले आहेत. मंगळवारी (ता. २४) घेतलेल्या बैठकीत त्यांनी सात दिवसांत संपूर्ण नागपूर शहरातील खड्डे बुजविण्याचे निर्देश दिले. याच अनुषंगाने गुरुवारी (ता. २६) मनपा आयुक्त अभिजीत बांगर यांनी नागपूर शहरातील खड्डे बुजविण्याच्या कामाची प्रगती जाणून घेण्यासाठी आकस्मिक दौरा केला. यावेळी त्यांच्यासोबत अधीक्षक अभियंता (लोककर्म) मनोज तालेवार, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) सुनील कांबळे, लक्ष्मीनगर झोनचे सहायक आयुक्त राजू भिवगडे, कार्यकारी अभियंता आर.जी. खोत, डी.डी. मेंडुलकर, चंद्रकांत गभने उपस्थित होते. आयुक्त अभिजीत बांगर यांनी प्रारंभी लोहापूल आणि त्यानंतर कॉटन मार्केट येथील मेट्रोच्या कामामुळे पडलेल्या खड्ड्यांची पाहणी केली. मेट्रोच्या कामामुळे पडलेले खड्डे नागपूर मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी तातडीने बुजवावे, असे निर्देश त्यांनी दिले. रस्त्यालगत असलेले पाणी काढून आवश्यक तेथे पाईपलाईन टाकण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## ई-लायब्ररीतून भविष्यात अटलजींसारखे प्रज्ञावंत विद्यार्थी घडेल - ना. नितीन गडकरी




### नागपूर महानगरपालिकेद्वारा निर्मित ई-लायब्रीचे भूमीपूजन

नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून बजेरियासारख्या भागात तयार होणाऱ्या या ई -लायब्ररीतून भविष्यात अटलजींसारखे प्रज्ञावंत विद्यार्थी घडेल, असा विश्वास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी यांच्या पुढाकाराने लाल शाळेत ई लायब्ररीचे निर्माण होणार आहे. त्याच्या भूमीपूजनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महापौर नंदा जिचकार, आमदार विकास कुंभारे, उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे, ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी, अतिरिक्त आयुक्त अझीझ शेख प्रामुख्याने उपस्थित होते.पुढे बोलताना ना.गडकरी म्हणाले, बजेरियासारख्या भागात ई लायब्ररी निर्माण करणे ही खरंच अभिनंदनीय बाब असे म्हणत अशी नावीन्यपूर्ण संकल्पा प्रत्यक्षात आणल्याबद्दल त्यांनी दयाशंकर तिवारी यांची प्रशंसा करत अभनंदन केले. या वाचनालयाच्या माध्यमातून भविष्यात नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जाणार आहेत. या लायब्ररीतून भविष्यात उत्कृष्ट दर्जाचे इंजिनिअर, वैज्ञानिक, डॉक्टर तयार होतील, असा मला विश्वास आहे. नागपूरचा विकास हा केवळ रस्ते, उद्याने यापुरता मर्यादित नाही तर नागपूरचा विकास हा चौफेर व्हायला हवा. त्यात शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, क्रीडा या सर्व क्षेत्रातील विकास आवश्यक आहे. या वाचनालयामध्ये दिव्यांगांनाही महत्व देण्यात येणार आहे. दिव्यांगाना आवश्यक त्या सोयीसुविधा यामध्ये अंतर्भूत असणार आहेत, ही प्रशंसनीय बाब आहे. या ज्ञानाचा उपयोग देशाच्या विकासासाठी करावा, असे ते म्हणाले. शहरातील तरुणांबाबत बोलताना ते म्हणाले, तरुणांच्या शारिरिक विकासासाठी शहरात १५० मैदानांचे निर्माण करणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. मैदाने तयार झाल्यावर खेळाडूंनीही शहराच नाव उंच करावे, असेही ते म्हणाले.बजेरिया भागात उद्यान तयार करण्यासाठी त्यांनी खासदार निधीतून निधी देण्याची घोषणा यावेळी केली. या उद्यानासाठी आमदार सुधाकर देशमुख यांनी ५० लाखांचा निधी मंजूर केला असल्याची माहिती त्यांनी दिली. आमदार विकास कुंभारे यांनीही यासाठी निधी मंजूर केलेला आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी यांनी ई - लायब्ररी तयार करण्यामागील पार्श्वभूमी आणि सविस्तर माहिती दिली. ग्रंथालयाची इमारत 'ग्रीन' राहणार असून या लायब्ररीला आयआयटी खरगपूरशी जोडण्यात आलेले आहे. यामुळे विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनासाठी पूर्ण सहकार्य मिळेल. या लायब्ररीमध्ये ब्रेल लिपी असणाऱ्या संगणकाचा समावेश करण्यात आलेला आहे. ब्रिटीश ई- लायब्ररीच्या आधारावर या लायब्ररीची संकल्पना तयार करण्यात आलेली आहे. माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचे नाव या लायब्ररीला देण्यात येणार आहे. अत्याधुनिक सोयीने उपयुक्त ही लायब्ररी भविष्यात विद्यार्थ्यांना फायदेशीर व दिशादर्शक ठरणार आहेत.

## शाश्वत विकासातून प्रदूषण मुक्तीकडे शहराची वाटचाल : महापौर नंदा जिचकार

### त्रिमूर्तीनगर येथील अग्निशमन केंद्र व 'तेजस्विनी बस'चे लोकार्पण

आज शहराचा चौफेर विकास होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून शहरात विविध विकास कामे सुरू आहेत. केवळ सिमेंट रस्ते आणि उड्डाण पूल यामुळेच नाही तर शहराच्या शास्वत विकासासाठी दोन्ही नेते कार्य करीत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने नागरिकांच्या सुरक्षेसाठी अग्निशमन केंद्र व महिलांच्या सुविधेसाठी 'तेजस्विनी' इलेक्ट्रिक बस सुरू करण्यात येत आहे. इलेक्ट्रिक बस प्रदूषणमुक्तीच्या दृष्टीने महत्वपूर्ण पाऊल असून शास्वत विकासातून प्रदूषण मुक्तीकडे नागपूर शहराची महत्वपूर्ण वाटचाल सुरू झाली आहे, असे प्रतिपादन महापौर नंदा जिचकार यांनी केले.महानगरपालिकेच्या वतीने प्रभाग क्र. ३६ अंतर्गत त्रिमूर्तीनगर जलकुंभजवळ रिंग रोड, भामटी येथे उभारण्यात आलेल्या त्रिमूर्तीनगर अग्निशमन केंद्राचे तसेच खास महिलांच्या सुविधेसाठी मनपाच्या परिवहन ताफ्यात दाखल होणा-या इलेक्ट्रिकवरील 'तेजस्विनी बस' सेवेचे मंगळवारी (ता.१०) महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते लोकार्पण झाले. पुढे बोलताना महापौर म्हणाल्या, वाढते प्रदूषण लक्षात घेता येत्या २०३० पर्यंत पेट्रोल, डिझेलवरील वाहने पूर्णपणे बंद होतील. त्यामुळे सर्व वाहने सीएनजी वर चालविले जातील. भविष्यातील ही समस्या पाहता नागपूर महानगरपालिकेने 'तेजस्विनी' इलेक्ट्रिक बससह शहरात विविध ठिकाणी इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशन उभारली आहेत, हे महत्त्वपूर्ण पाऊल आहे. याशिवाय नागरिकांना आपत्कालीन सेवा देण्यासाठी शहरात अग्निशमन केंद्र उभारण्यात आली आहेत. याच श्रृंखलेत त्रिमूर्ती नगर येथे अद्ययावत अग्निशमन केंद्र उभारण्यात आले आहे. नागरिकांना चोवीस तास सेवा उपलब्ध व्हावी यासाठी केंद्रालगतच १२ निवासी सदनिका तयार करण्यात आल्या आहेत याचा नागरिकांना निश्चितच फायदा होईल. मात्र आज शहरात अग्निशमन केंद्रांची संख्या कमी आहे. त्यामुळे अद्ययावत अग्निशमन केंद्रांची संख्या वाढविण्यासाठी मनपातर्फे सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असेही महापौर नंदा जिचकार म्हणाल्या. प्रास्ताविकात अग्निशमन समिती सभापती ॲड. संजयकुमार बालपांडे यांनी केंद्राबाबत विस्तृत माहिती दिली. शहर स्मार्ट होत असताना नागरिकांच्या सुरक्षेसाठी स्मार्ट यंत्रणा लक्षात घेऊनच त्रिमूर्ती नगर येथे अद्ययावत अग्निशमन केंद्र तयार करण्यात आले आहे. आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांना तात्काळ सेवा मिळावी यासाठी अग्निशमन अधिकारी व कर्मचा-यांसाठी केंद्रातच सदनिका बांधण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले.परिवहन समिती सभापती जितेंद्र (बंटी) कुकडे यांनीही 'तेजस्विनी' इलेक्ट्रिक बसची संकल्पना स्पष्ट केली

## झुडपी जंगल जागांवरील अतिक्रमितांनाही मिळणार स्थायी पट्टे : चंद्रशेखर बावनकुळे

### पश्चिम नागपूर मतदारसंघातील नागरिकांना पंजीबद्ध स्थायी पट्ट्यांचे वितरण

राज्यातील प्रत्येक नागरिकाला त्याचा हक्क मिळावा. प्रत्येक शासकीय योजनांचा लाभ मिळावा, यासाठी शासन सतत प्रयत्नरत असते. सन २०११ पूर्वीच्या अतिक्रमितांना पंजीबद्ध स्थायी पट्टे मिळवून देण्यासाठी शासनाने आदेश जारी केला. त्यानुसार प्रत्येक अतिक्रमितांना पट्ट्यांचे वाटप होत आहे. झुडपी जंगलाच्या जागेवरील अतिक्रमितांनाही पट्टे मिळावी यासाठी सरकारने न्यायालयाचे दार ठोठावले. आता तोही मार्ग मोकळा झाला असून अशा अतिक्रमितांनाही पंजीबद्ध स्थायी पट्टे मिळणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे ऊर्जामंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.नागपूर महानगरपालिका व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने पश्चिम नागपूर मतदारसंघातील मरियम नगर, विकास नगर, विश्वास नगर, गोंडटोली, फुटाळा, मरारटोली येथील झोपडपट्टीवासीयांना पंजीबद्ध स्थायी पट्ट्यांचे वितरण बुधवारी (ता. ११) रविनगर चौकातील अग्रसेन भवन येथे आयोजित कार्यक्रमात करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी पश्चिम नागपूरचे आमदार सुधाकर देशमुख होते. महापौर नंदा जिचकार यांनीही नागपूर शहराच्या विकासावर प्रकाश टाकला. नागरिकांना सोयीसुविधा देण्यासाठी नागपूर महानगरपालिका सदैव तत्पर आहे. नागरिकांनीही शहराच्या विकासात सहभाग द्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.यानंतर नागपूर महानगरपालिका व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने संबंधित परिसरातील लाभार्थ्यांना पंजीबद्ध स्थायी पट्ट्यांचे वाटप ना. चंद्रशेखर बावनकुळे, महापौर नंदा जिचकार, आमदार सुधाकर देशमुख व अन्य मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. पट्टेवाटप कार्यक्रमाचे संचालन नोडल अधिकारी मिलिंद मेश्राम यांनी केले. कार्यक्रमातील पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ११ सप्टेंबर ते २७ ऑक्टोबर या दरम्यान 'स्वच्छता ही सेवा' महापौर नंदा जिचकार आणि आयुक्त अभिजित बांगर यांची माहिती

नागपूर महानगरपालिकेद्वारे ११ सप्टेंबर ते २७ ऑक्टोबर या दरम्यान स्वच्छता ही सेवा मोहिम राबविण्यात येणार आहे. ही मोहिम तीन टप्प्यात राबविण्यात येणार असल्याची माहिती महापौर नंदा जिचकार आणि आयुक्त अभिजित बांगर यांनी दिली. महापौर व आयुक्त यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन सोमवारी मनपा मुख्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात करण्यात आले. यावेळी स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, लता काडगाये, राजकुमार साहू, अमर बागडे, वंदना यंगटवार, माधुरी ठाकरे, अभिरूची राजगिरे, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, सहायक आयुक्त प्रकाश वराडे, अशोक पाटील, हरिश राऊत, गणेश राठोड, सुभाष जयदेव, आरोग्याधिकारी डॉ.सुनील कांबळे, स्वच्छ भारत अभियानचे नोडल अधिकारी डॉ.प्रदीप दासरवार प्रामुख्याने उपस्थित होते. प्रारंभी महापौर नंदा जिचकार यांनी या मोहिमेविषयी सांद्यत माहिती सांगितली. ही मोहिम तीन टप्प्यात असून १८ सप्टेंबर रोजी या मोहिमेची सुरूवात सर्व प्रभागापासून करण्यात येईल. सर्व प्रभागामध्ये स्वच्छता व प्लास्टिकमुक्तीची जनजागृती करणारी रॅली आयोजित करण्यात येणार आहे. त्यांनतर प्रभागामध्ये श्रमदान चळवळ करण्यात येणार आहे. यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्यात येणार असून ज्या संस्था चांगल्या रितीने काम करताना दिसून येणार आहे, त्यांना महापौर उत्कृष्ट स्वयंसेवी संस्था पुरस्कार देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. ठिकठिकाणी आपल्याला प्लास्टिक पडलेले दिसते. ते टाकाऊ प्लास्टिक वापरू न ये याबाबत नागरिकांना आवाहन करण्याचे निर्देश महापौरांनी यावेळी बोलताना दिले. शहरातील मोठ्या प्रमाणावर लोक सहभागातून श्रमदान करून मिळवेलेल प्लास्टिक पुनर्प्रक्रियेसाठी पाठविण्याची व्यवस्था करण्यात यावी, असेही महापौर म्हणाल्या. नागपूर महानगरपालिकेमध्ये शासन निर्णयानुसार बंद करण्यात आलेल्या प्लास्टिकवर कार्यवाही करण्यासाठी उपद्रव शोध प्रतिबंध पथकाद्वारे कारवाई करण्यात येईल, असा ईशारा महापौरांनी यावेळी दिला. पहिल्यांदा गुन्हा केल्यास पाच हजार रूपये, दुसऱ्यांदा गुन्हा केल्यास दहा हजार रूपये, तिसऱ्यांदा गुन्हा केल्यास २५ हजार रूपये दंडाची रक्कम वसूल करण्यात येईल, असेही महापौर नंदा जिचकार यांनी सांगितले. प्लास्टिक मुक्त नागपूर या संकल्पनेसाठी नागपूर महानगरपालिका सदैव तत्पर असते, नागरिकांनी या लोकसहभागामध्ये पुढाकार घ्यावा, असे आवाहन यावेळी त्यांनी केले. यापुढे नागपूर महानगरपालिकेचे मुख्यालय, सर्व झोन कार्यालये, मनपाचे दवाखाने, शाळा येथील अधिकारी व कर्मचारी यांनी एकदाच वापरात येणाऱ्या प्लास्टिकवर त्यांनी प्रतिबंध टाकावा, असे मी महापौर म्हणून आवाहन करते, असेही त्या यावेली म्हणाल्या. यावेळी आयुक्त अभिजित बांगर यांनी कचरा विलगीकरणासंदर्भात अनेक तक्रारी येत असल्याचे सांगितले. यानंतर कचरा संकलन करण्याऱ्यांनी जर कचरा विलगीकरण न करता नेला तर त्यावर दंड आकारण्यात येईल, असा ईशारा आयुक्त अभिजित बांगर यांनी दिला. सर्व झोनल अधिकारी यांनी यावर विशेष लक्ष देऊन ही कार्यवाही पूर्ण होते की नाही, हे बघावे, असेही म्हणाले.

## नागपूर महानगरपालिका व इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.मध्ये सामंजस्य करार

### तलावांच्या स्वच्छतेसाठी करणार 'फ्लोटिंग बोट' संचालित

शहरातील तलावांच्या स्वच्छतेसाठी नागपूर महानगरपालिकेला इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड मुंबईचे सहकार्य लाभले आहे. तलावांच्या स्वच्छतेसाठी आवश्यक 'रिमोट कंट्रोल फ्लोटिंग बोट'बाबत नागपूर महानगरपालिका व इंडियन ऑईल कॉर्पोरेशप लिमिटेड मुंबई यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. गुरूवारी (ता.१२) मनपाच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीमधील आयुक्त सभागृहामध्ये आयुक्त अभिजीत बांगर यांच्या उपस्थितीमध्ये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.चे (महाराष्ट्र कार्यालय) कार्यकारी निदेशक (प्रभारी) मुरली श्रीनिवासन आणि नागपूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त राम जोशी ह्यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. शहरातील तलावांच्या स्वच्छता आणि सौंदर्यीकरणासाठी 'रिमोट कंट्रोल फ्लोटिंग बोट'साठी नागपूर महानगरपालिकेतर्फे इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. मुंबई यांना सीएसआर निधीमधून पाच फ्लोटर बोटची विनंती करण्यात आली होती. यावर इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.ने एक 'फ्लोटर बोट' निविदेद्वारे खरेदी करण्याकरीता मनपाला दोन टप्प्यात २९ लाख रुपये देण्याचे मंजूर केले होते.

## महापौर नंदा जिचकार यांची 'द न्यूयॉर्क टाईम्स'ने घेतली दखल

'बदलत्या वातावरणाचे परिणाम आणि उपाय' यावर मुलाखत

जगभरातील बदलते वातावरण, त्याचे परिणाम आणि उपाय' यावर आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध शहरातील महापौरांचा समावेश असलेल्या ग्लोबल कोवेनट ऑफ मेयर्स (जिका) एक चळवळ सुरू केली आहे. यामाध्यमातून परिणामांवर चर्चा आणि उपायांचा आराखडा तयार केला जात आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरू असलेल्या या चळवळीची 'द न्यूयॉर्क टाईम्स'ने दखल घेतली आहे. जिकॉमच्या सदस्य असलेल्या नंदा जिचकार यांच्यासह अन्य सदस्यांच्या विषयाशी संबंधित मुलाखती प्रकाशित करून एका ज्वलंत विषयाला हात घातला आहे.'द न्यूयॉर्क टाईम्स'ने प्रकाशित केल्यानुसार, आयपीसीसीने सन २०१८ रोजी प्रकाशित केलेल्या अहवालानुसार, सन २०४० मध्ये ग्लोबल वॉर्मिंग १.५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहचेल. ही भीती लक्षात घेता अनेक राष्ट्रांनी जनजागृतीसाठी पुढाकार घेतला असून ग्लोबल वार्मिंगची भयावहता टाळण्यासाठी उपाययोजना सुरू केल्या आहेत. परंतु यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहे. जगातील २४ देश आणि युरोपियन युनियनने एकत्र येऊन क्लिन एनर्जी उपक्रमाला प्रोत्साहन देण्यासाठी 'मिशन इनोव्हेशन' उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमामध्ये नुकतेच ग्लोबल कोवेनंट ऑफ मेयर भागीदार झाले आहे.ग्लोबल कोवेनंट ऑफ मेयर जगभरातील १० हजार शहरांशी जुळले असून क्लिन एनर्जी निर्माण करण्याच्या दृष्टीने संशोधन करीत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या समूहाने एकत्र येऊन एखाद्या जागतिक समस्येवर तोडगा काढण्यासाठी पुढाकार घेण्याची ही पहिलीचे वेळ असल्याचे 'द न्यूयॉर्क टाईम्स'ने विशेषत्वाने नमूद केले आहे. हे सांगतानाच 'द न्यूयॉर्क टाईम्स'ने ग्लोबल कोवेनंट ऑफ मेयर्सचे सदस्य असलेल्या दक्षिण आशियातील एकमेव प्रतिनिधी नागपूरच्या महापौर नंदा जिचकार यांच्यासह इंडोनेशियातील सुराबया शहराच्या महापौर ट्राय रिसमहारिनी, घानातील एकारा शहराचे महापौर मोहम्मद अदजई सोव्हा, कॅनडातील एडमॉन्टन येथील महापौर डॉन इव्हेसन, केनित्राचे महापौर अझीझ रब्बाह, युरोपियन कमिशनचे उपाध्यक्ष मारोस सेफकोविक, इंग्लडचे माजी मंत्री क्रिस स्किडमोर यांच्या मुलाखती घेत त्यांच्या शहरात बदलत्या वातावरणाचे परिणाम टाळण्यासाठी काय उपाययोजना सुरू आहेत, यावर मुलाखती घेऊन प्रकाशित केल्या आहेत. खासगी क्षेत्रासोबत विकास करताना नावीन्यपूर्ण काय धोरण आखले आहे, या प्रश्नाच्या उत्तरात महापौर नंदा जिचकार यांनी सांगितले की, नागपुरात अनेक प्रकल्प पीपीपी तत्त्वावर यशस्वीरीत्या सुरू आहेत. नागपूर शहराने पारंपरिक वीज दिवे एलईडीमध्ये परावर्तीत करीत ऊर्जा बचतीच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. सुमारे एक लाख १० हजार पथदिवे एलईडीमध्ये परावर्तीत करीत ४० टक्के ऊर्जेची बचत सुरू केली आहे. कमी ऊर्जा बिलांमधून उत्पन्न झालेल्या बचतीद्वारे अर्थसहाय्य केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

# थोडक्यात...

## एम्सच्या सहकार्याने मनपाच्या आरोग्य सेवेला मिळणार बळकटी : महापौर नंदा जिचकार

### मनपा, एम्स व टाटा ट्रस्टमध्ये सामंजस्य करार

शहरातील नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी नागपूर महानगरपालिका कटिबद्ध आहे. सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा पुरविण्याचा नेहमीच मनपातर्फे प्रयत्न केला जात आहे. टाटा ट्रस्टच्या सहकार्याने आरोग्य सुविधेमध्ये बरीच सुधारण्यात करण्यात आली आहे. आता यामध्ये एम्स नागपूरची साथ मिळणार असल्याने मनपाच्या आरोग्य सुविधेला अधिक बळकटी मिळणार आहे, असा विश्वास महापौर नंदा जिचकार यांनी व्यक्त केला.मनपाच्या दवाखान्यांमधून अद्ययावत तंत्रज्ञानाच्या सहायाने उत्तम आरोग्य सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने गुरूवारी (ता.५) नागपूर महानगरपालिका, एम्स नागपूर व टाटा ट्रस्ट यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीमधील आयुक्त सभागृहामध्ये आयुक्त अभिजीत बांगर, एम्स नागपूरच्या डायरेक्टर मेजर जनरल डॉ. विभा दत्ता व टाटा ट्रस्टचे आरोग्य संचालक श्रीनिवास यांनी करारावर स्वाक्षरी केली.शहरातील आरोग्य सुविधेच्या दृष्टीने हा मोठा करार आहे. यामुळे शहरातील नागरिकांना फायदा होणार आहे. मनपा आरोग्य सेवेला बळकटी देणारा करार असून जास्तीत जास्त नागरिकांना या सेवेचा लाभ घेता यावा यासाठी मनपा प्रशासनातर्फे आवश्यक सर्व प्रयत्न केले जाणार आहेत. याशिवाय शहरातील स्वयंसेवी संस्थांचीही यासाठी मदत घेण्यात येईल, असे मत मनपा आयुक्त अभिजीत बांगर यांनी यावेळी व्यक्त केले.

## मनपाच्या सेवेतून २४ अधिकारी व कर्मचारी निवृत्त



नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभागामध्ये सेवा देणारे २४ अधिकारी व कर्मचारी सोमवारी (ता.३०) सेवेतून निवृत्त झाले. मनपातर्फे सर्व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचा–यांचा मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्थायी समिती सभागृहामध्ये सत्कार करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमाला निगम अधीक्षक (साप्रवि) मदन सुभेदार, सहायक अधीक्षक मनोज कर्णिक, सहायक अधीक्षक (पेन्शन) मुकेश साकोरे, सहायक जनसंपर्क अधिकारी प्रदीप खर्डेनवीस, डोमाजी भडंग आदी उपस्थित होते.यावेळी मान्यवरांच्या हस्ते सर्व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचा–यांचा हस्ते शाल, श्रीफळ, तुळशीचे रोप आणि धनादेश प्रदान करुन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे संचालन सहायक जनसंपर्क अधिकारी प्रदीप खर्डेनवीस यांनी केले. यावेळी जनसंपर्क विभागातील सहायक दिलीप तांदळे यांच्यासह विविध विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचा–यांमध्ये अग्निशमन विभागातील सब ऑफीसर व्ही.आर.वंजारी, आरोग्य विभागातील लोपॅथीक कम्पाउंडर आर.के.मेंढे, आरोग्य विभागातील लिडींग फायरमन आय.जी.गिरी, आरोग्य विभागातील लॉरी ड्रायव्हर डी.एस.तांबे, जलप्रदाय विभागातील उच्च श्रेणी लिपीक पी.जी.सोनक, आरोग्य विभागातील उच्च श्रेणी लिपीक एम.व्ही.दारकोंडे, स्थानिक संस्था कर विभागातील मोहरीर अनील गणेर, बाजार विभागातील कनिष्ठ निरीक्षक ए.बी.नारनवरे, कर व कर आकारणी विभागातील कनिष्ठ लिपीक सुभाष हटवार, कर संग्राहक विजय वैद्य, प्रकाश विभागातील हवालदार एस.एस.सतभैय्या, शिक्षण विभागातील एल.टी.डी.मा. विद्या मुनीश्वर, सहायक शिक्षिका शिला रफेल फ्रान्सीस, कर व कर आकारणी विभागातील चपराशी अशोक पाठक, आरोग्य विभागातील चपराशी दिपक तांबोळी, शिक्षण विभागातील चपराशी सतीश जबलपुरे, कर व कर आकारणी विभागातील खलाशी प्रेमनाथ फाये, आरोग्य विभागातील सहायक कामगार मनोज बैरीसाल, सहायक कामगार मीरा तुरर्केल, सहायक कामगार भीमराव सुखदेवे, सहायक कामगार किशोर शेंदरर्नीकर, सहायक कामगार कौशल्या समुंद्रे, सहायक कामगार मनोरमा हजारे, कुसुम सोनटक्के यांचा समावेश आहे.

## मनपाद्वारे शहरात १३४३० वैयक्तिक शौचालयाचे निर्माण

### अतिरिक्त आयुक्त राम जोशी यांची माहिती : पुढील वाटचालीकरिता मनपाचे प्रयत्न

नागपूर महानगरपालिकेने नागपूर शहरात १३४३० वैयक्तिक शौचालयांचे निर्माण करीत हागणदारीमुक्त नागपूरच्या पुढील वाटचालीच्या दिशेने पाऊल टाकले आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात शौचालय निर्माण करीत अनेक कुटुंबांना स्वच्छता अभियानाचे महत्त्व पटवून सांगितले आहे. आता महानगरपालिका ओडीएफ प्लस प्लसच्या मानांकनासाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त राम जोशी यांनी दिली.नागपूर शहराला महाराष्ट्र शासनाने यापूर्वीच हागणदारीमुक्त घोषित केले आहे. शहरात स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत शहरात वैयक्तिक शौचालय निर्माण करण्यासाठी २४ हजार २८४ अर्ज प्राप्त झाले होते. त्याची छाननी झाल्यानंतर १३४३० पात्र लाभार्थ्यांसाठी नागपूर महानगरपालिकेकडून वैयक्तिक शौचालय निर्माण करण्यात आले आहे. शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये ९९ सामूहिक शौचालयाचे निर्माण करण्यात आले आहे. याव्यतिरिक्त शहरात ६८ सार्वजनिक शौचालयाचे निर्माण झाले असून पाच शौचालयाचे कार्य प्रगतीपथावर आहे. वदर्ळीच्या जागी हे शौचालये निर्माण करण्यात आले आहे. यामध्ये नेताजी मार्केट, बुधवार बाजार, गोकुळपेठ, भाजीमंडई, फुले बाजार, मेहाडिया चौक याठिकाणी सुलभ शौचालयाचे निर्माण करण्यात आले आहे. शहरात सार्वजनिक शौचालयाचे नियंत्रण हे सुलभ शौचालय प्रकल्पाअंतर्गत करण्यात येत आहे. सामूहिक शौचालयाची स्वच्छता ब्रिस्क या कंपनीकडे आहे. जुन्या शौचालयांचे नूतनीकरणसुद्धा करण्यात येणार असून यासाठी दोन कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.शहर हागणदारीमुक्त शहराच्या पलिकडे जाण्याच्या दृष्टीने नागपूर महानगरपालिकेची वाटचाल करित आहे. या शौचालयाच्या निर्मितीमुळे गरीब कुटुंबांना दिलासा मिळाला आहे.

## मनपाद्वारे शहरात १३४३० वैयक्तिक शौचालयाचे निर्माण

नागपूर महानगरपालिकेने नागपूर शहरात १३४३० वैयक्तिक शौचालयांचे निर्माण करीत हागणदारीमुक्त नागपूरच्या पुढील वाटचालीच्या दिशेने पाऊल टाकले आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात शौचालय निर्माण करीत अनेक कुटुंबांना स्वच्छता अभियानाचे महत्त्व पटवून सांगितले आहे. आता महानगरपालिका ओडीएफ प्लस प्लसच्या मानांकनासाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त राम जोशी यांनी दिली. नागपूर शहराला महाराष्ट्र शासनाने यापूर्वीच हागणदारीमुक्त घोषित केले आहे. शहरात स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत शहरात वैयक्तिक शौचालय निर्माण करण्यासाठी २४ हजार २८४ अर्ज प्राप्त झाले होते. त्याची छाननी झाल्यानंतर १३४३० पात्र लाभार्थ्यांसाठी नागपूर महानगरपालिकेकडून वैयक्तिक शौचालय निर्माण करण्यात आले आहे. शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये ९९ सामूहिक शौचालयाचे निर्माण करण्यात आले आहे. याव्यतिरिक्त शहरात ६८ सार्वजनिक शौचालयाचे निर्माण झाले असून पाच शौचालयाचे कार्य प्रगतीपथावर आहे. वदर्ळीच्या जागी हे शौचालये निर्माण करण्यात आले आहे. यामध्ये नेताजी मार्केट, बुधवार बाजार, गोकुळपेठ, भाजीमंडई, फुले बाजार, मेहाडिया चौक याठिकाणी सुलभ शौचालयाचे निर्माण करण्यात आले आहे. शहरात सार्वजनिक शौचालयाचे नियंत्रण हे सुलभ शौचालय प्रकल्पाअंतर्गत करण्यात येत आहे. सामूहिक शौचालयाची स्वच्छता ब्रिस्क या कंपनीकडे आहे.

# स्ट्रीट सॉकर स्कॉटलँडच्या चमूची नागपूर महानगरपालिकेला भेट

### 'स्लम सॉकर' नागपूर महानगरापालिकेच्या विद्यार्थ्यांना देणार फुटबॉलचे प्रशिक्षण

समाजातील गरीब व झोपडपट्टीमधील विद्यार्थ्यांना व खेळाडूंना खेळासोबतच अभ्यासात रूची वाढावी याकरिता 'स्लम सॉकर' ही संस्था नागपूर महानगरपालिकेतील विद्यार्थ्यांना फुटबॉल या खेळासोबतच गणित, इंग्रजी, विज्ञान आणि भाषेचे प्रशिक्षण देणार आहे. शुक्रवारी 'स्लम सॉकर' या संस्थेसोबतच स्ट्रीट सॉकर स्कॉटलँडच्या चमूने नागपूर महानगरपालिकेला भेट दिली. यावेळी अतिरिक्त आयुक्त राम जोशी यांनी त्यांच्याशी चर्चा केली.यावेळी अतिरिक्त आयुक्त राम जोशी यांनी सर्व मान्यवरांचा तुळशीचे रोपटे व दुपट्टा देऊन सत्कार केला. स्ट्रीट सॉकर ह्या संघटनेतील सदस्य स्कॉटलँडवरून नागपूरमधील विविध सांस्कृतिक, क्रीडा क्षेत्रातील माहिती जाणून घेण्यासाठी नागपुरात आलेले आहेत. स्कॉटलँडमधील स्लम वस्तीतील तसेच गरीब विद्यार्थ्यांना फुटबॉल सोबतच गणित, इंग्रजी व भाषेचे प्रशिक्षण देते. याचीच सहकारी संस्था म्हणजे नागपुरातील स्लम सॉकर. ही संस्था विविध झोपडपट्टीमधील व गरीब विद्यार्थ्यांना फुटबॉलसोबतच अभ्यासाचे धडे देणार आहे. या योजनेअंतर्गत नागपूर महानगरपालिकेतील विद्यार्थ्यांना फुटबॉल प्रशिक्षणासोबतच गणित, विज्ञान, भाषा या सर्वांचे प्रशिक्षण देण्यात येणार असल्याची माहिती स्लम सॉकरचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिजीत बारसे यांनी दिली. हा अतिशय स्तुत्य उपक्रम असून यामुळे नागपूर महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. ज्या मनपाच्या शाळांमध्ये फुटबॉल खेळू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त असेल, त्या शाळेत हे प्रशिक्षण शिबिर सुरू करण्यात यावे, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त राम जोशी यांनी दिले.

## मनपाच्या 'आपली बस'ची माहिती आजपासून 'चलो ॲप'वर

### नागपूर महानगरपालिका व झोपहोप टेक्नॉलॉजी प्रा.लि.मध्ये सामंजस्य करार

नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागाद्वारे संचालित 'आपली बस'ची संपूर्ण माहिती आता 'चलो ॲप'वर मिळणार आहे. याबाबत बुधवारी (ता.१८) आयुक्त अभिजीत बांगर व परिवहन समिती सभापती जितेंद्र (बंटी) कुकडे यांच्या प्रमुख उपस्थितीत नागपूर महानगरपालिका व झोपहोप टेक्नॉलॉजी प्रा.लि. यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी मनपा उपायुक्त तथा परिवहन व्यवस्थापक राजेश मोहिते व झोपहोप टेक्नॉलॉजी प्रा.लि.द्वारा निर्मित 'चलो ॲप'चे संचालक सुमीत बावा यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.झोपहोप टेक्नॉलॉजी प्रा.लि.द्वारा देशातील २१ शहरांमध्ये 'चलो' हे ॲप सुविधा देत असून नागपुरात उद्या गुरूवार (ता.१८) पासून ॲपची सेवा सुरू होईल. उद्या गुरूवार (ता.१९)पासून ॲप ॲन्ड्राईड मोबाईलवर प्ले–स्टोवरुन 'चलो' हे ॲप डाउनलोड करता येईल. 'आपली बस'ने प्रवास करताना इच्छित स्थळी जाणारी बस किती वेळेमध्ये आपल्या जवळच्या शहर बस स्थानकावर येणार आहे याची योग्य माहिती ॲपद्वारे मिळेल त्यामुळे प्रवाशांना आधीच आपल्या प्रवासाबाबत खात्री करता येईल. 'चलो' या ॲपमुळे 'आपली बस'चा प्रवास अधिक सुकर आणि खात्रीशीर होणार आहे.'चलो ॲप' कार्यान्वित करण्याबाबत नागपूर महानगरपालिकेवर कोणतेही आर्थिक भार पडणार नसून यासाठी लागणारे सर्व कॅपीटल कॉस्ट व ऑपरेशनल कॉस्ट हे झोपहोप टेक्नॉलॉजी प्रा.लि. यांच्यामार्फत करण्यात येणार आहे. 'चलो ॲप'मुळे मनपाच्या 'आपली बस'चे संपूर्ण नियंत्रण व अचूक वेळेची माहिती मनपाला उपलब्ध होणार आहे. यावेळी परिवहन विभागाचे विनय भारद्वाज, समीर परमार, प्रभव बोकारे, गिरीश महाजन यांच्यासह विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

## सार्वजनिक ठिकाणी थुंकणे व उघड्यावर लघवी करणा-या २३८४ जणांवर कारवाई

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी थुंकणे व उघड्यावर लघवी करणा–या २३८४ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. दहाही झोनमधील पथकाद्वारे ११ डिसेंबर २०१७ ते १० ऑक्टोबर २०१९ दरम्यान ही कारवाई करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, सिव्हील लाईन्स येथील मनपा मुख्यालय परिसरातही उपद्रव शोध पथकाद्वारे उघड्यावर लघवी व थुंकणा–या ११० जणांवर कारवाई करून दंड वसूल करण्यात आला आहे. मनपा आयुक्त अभिजीत बांगर, अतिरिक्त आयुक्त राम जोशी यांच्या मार्गदर्शनात उपद्रव शोध पथकाचे स्कॉड लिडर विरसेन तांबे यांच्या नेतृत्वात पथकाद्वारे कारवाई सुरू आहे. नियमांचे उल्लंघन करुन शहर विद्रुप करणा–यांवर कारवाई करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे उपद्रव शोध पथक तैनात करण्यात आले आहे. झोन स्तरावर पथकाची नेमणूक करण्यात आली असून पथकामध्ये ८७ जणांचा समावेश आहे.उपद्रव शोध पथकाद्वारे ११ डिसेंबर २०१७ ते १० ऑक्टोबर २०१९ या कालावधीत सार्वजनिक ठिकाणी थुंकणा–या १०५२ जणांवर कारवाई करुन ९५ हजार ८०० रुपये दंड वसूल केला तर उघड्यावर लघवी करणा–या १३३२जणांकडून २ लाख ९ हजार ७०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. दोन्ही कारवाईमध्ये एकूण २३८४ जणांकडून ३ लाख ५ हजार ५०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

### हनुमान नगर, लक्ष्मीनगर व गांधीबाग झोनमध्ये सर्वाधिक कारवाई

उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी थुंकण्याबाबत सर्वाधिक कारवाई हनुमान नगर झोनमध्ये तर उघड्यावर लघवी करण्याबाबत लक्ष्मीनगर व गांधीबाग झोनमध्ये सर्वाधिक कारवाई करण्यात आली आहे. हनुमान नगर झोन मध्ये सार्वजनिक ठिकाणी थुंकणा–या सर्वाधिक २८९ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. यापाठोपाठ लक्ष्मीनगर झोनमध्ये १५९, गांधीबाग झोनमध्ये ११७, धरमपेठ झोनमधील ११५, आसीनगर झोनमध्ये ९५, लकडगंज झोन मधील ९१, धंतोली झोनमध्ये ८७, मंगळवारी झोनमधील ६२, नेहरु नगर झोनमधील २७ व सतरंजीपुरा झोनमधील १० जणांवर कारवाई करण्यात आली आहे. लक्ष्मीनगर व गांधीबाग झोनमध्ये उघड्यावर लघवी करणा–या प्रत्येकी २५५ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. या पाठोपाठ धंतोली झोनमध्ये २१०, मंगळवारी झोनमध्ये १४९, धरमपेठ व लकडगंज झोनमध्ये प्रत्येकी ११४, आसीनगर झोनमध्ये १०८, हनुमान नगर झोनमध्ये ७१, नेहरू नगर झोनमध्ये ४५ व सतरंजीपुरा झोनमध्ये ११ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. झोनस्तरावर तैनात उपद्रव शोध पथकाकडून ही कारवाई करण्यात आली आहे.

## नागपुरात मुलींच्या जन्मदराचे प्रमाण वाढले

### एक हजार मुलांमागे ९६८ मुली : पीसीपीएनडीटी बैठकीत माहिती सादर

नागपूर महानगरपालिकेतर्फे लिंग गुणोत्तर वाढविण्यासाठी वेळोवेळी करण्यात आलेल्या जनजागृती अभियानाला यश येत असल्याचे दिसून येत आहे. सन २०११ च्या जनगणनेच्या तुलनेत जानेवारी ते जुलै २०१९ या कालावधीमध्ये नागपूर शहरातील मुलींच्या जन्मदाराचे प्रमाण वाढले आहे. शुक्रवारी (ता. २६) मनपा मुख्यालयातील उपसंचालक (आरोग्य) यांच्या कक्षात पीसीपीएनडीटी अंतर्गत झालेल्या जिल्हा सल्लागार समितीच्या बैठकीत ही माहिती देण्यात आली. मुलींचे जन्मदर कमी होण्यामागे समाजातील मानसिकता जबाबदार आहे. शहरात लिंग गुणोत्तर वाढविण्यासाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे वेळोवेळी जनजागृती केली जाते. सर्व डॉक्टर्सचे प्रशिक्षणही घेण्यात येते. याशिवाय सोनोग्रॉफी करणाऱ्या डॉक्टर्सचेही प्रबोधन करण्यात येते. त्याचेच फलित म्हणून शहरात मुलींच्या जन्मदराचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्राच्या सन २०११ च्या जनगणनेनुसार नागपूर शहरात एक हजार मुलींमागे ९२६ एवढे मुलींचे प्रमाण होते तर जानेवारी २०१९ ते जुलै २०१९ या कालावधीमध्ये नागपुरात एक हजार मुलींमागे ९६८ एवढे जन्मदराचे प्रमाण असल्याचे निदर्शनास आले आहे, अशी माहिती बैठकीमध्ये देण्यात आली. हे केवळ शहरातील सोनोग्राफी सेंटर व गॉयनॅकॉलॉजी सोसायटीच्या सकारात्मक भूमिकेमुळे शक्य झाले असल्याचे सांगत सर्वप्रथम त्यांचा अभिनंदनाचा प्रस्ताव बैठकीमध्ये ठेवण्यात आला.यावेळी आरोग्य उपसंचालक डॉ. भावना सोनकुसळे म्हणाल्या, शहरामध्ये पीसीपीएनडीटी नियमांचे व्यवस्थित पालन केले जाते. शिवाय मनपाच्या डॉक्टर्सतर्फे दर तीन महिन्यांनी शहरातील सोनाग्रॉफी केंद्राला भेट देऊन तपासणीही केली जाते. मुलींचा वाढलेला जन्मदर हे त्याचेच यश असल्याचे त्यांनी सांगितले. सोनोग्राफी मन्शीन्सना एमआरसी क्रमांक देण्यात येतो. पीसीपीएनडीटी अंतर्गत नोंदणी असलेल्या शहरातील एकूण ७९२ सोनोग्राफी मशीन्सना एमआरसी क्रमांक देण्यात येत आहे. यामध्ये ७२३ सोनोग्रॉफी उपकरणे तरे १७ एमआरआय, ४३ सीटी स्कॅन, ९बी स्कॅन या उपकरणांचा यात समावेश आहे. शहरातील मुलींच्या जन्मदराचे प्रमाण वाढणे ही आनंददायी बाब आहे. सामाजिक मानसिकता बदलत असल्याचे यावरून दिसून येत आहे. तसेच मुलींच्या जन्माचे स्वागतदेखिल व्हायला लागले आहे. मात्र शहरातील सोनोलॉजिस्ट, स्त्री रोग तज्ज्ञ यांनीही सजग राहणे आवश्यक आहे. कुणीही लिंगनिदान करू नये व इतरत्र कुठेही होऊ नये, याची सर्वांनी जबाबदारीने काळजी घ्यावी, असे आवाहन आरोग्य उपसंचालक डॉ. भावना सोनकुसळे यांनी केले.

## रेन वॉटर हार्वेस्टिंग, सौर ऊर्जा वापरा आणि करात सवलत मिळवा!

### पाणी संवर्धन आणि पर्यावरणीय दृष्टिकोनातून मनपाचे पाऊल

भविष्यातील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी आणि पर्यावरणीय दृष्टिकोनातून मनपाने स्तुत्य पाऊल उचलले आहे. रेन वॉटर हॉर्वेस्टिंग आणि सौर ऊर्जेच्या वापरासाठी नागरिकांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने स्वत:च्या घरावर रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम लावणाऱ्या आणि सौर ऊर्जेचा वापर करणाऱ्या नागरिकांना मालमत्तेच्या सामान्य करात सवलत देण्यात येते.रेन वॉटर हार्वेस्टिंग, सौर ऊर्जेचा वापर, गांडूळखत, घनकचऱ्यापासून खत निर्मिती व वापर यासारखे पर्यावरणीय प्रकल्प जर नागरिक राबवित असेल तर त्यांना सामान्य करामध्ये पाच ते १० टक्के कर सवलत नागरिक प्राप्त करू शकता, अशी माहिती सहायक आयुक्त (कर आकारणी) मिलिंद मेश्राम यांनी दिली. यामध्ये नमूद केलेल्या प्रकल्पांपैकी जर एक प्रकल्प नागपूर शहरातील नागरिक राबवत असेल तर सामान्य करात पाच टक्के सवलत मिळेल. एकापेक्षा अधिक प्रकल्प राबवत असेल तर सामन्य करामध्ये १० टक्के सवलत मिळेल. याशिवाय चालू वर्षाचा मालमत्ता कर ३० नोव्हेंबरपूर्वी अदा केला तर सामान्य कराच्या रक्कमेमध्ये चार टक्के सवलत मिळणार आहे. या पैकी जास्तीत जास्त पर्यावरणीय प्रकल्पांचा आपल्या मिळकतीमध्ये वापर करून आपल्या सामान्य करामध्ये सवलत प्राप्त करण्याचे आवाहन नागपूर महानगरपालिकेद्वारे करण्यात आलेले आहे. नागरिकांनी या मनपाच्या स्तुत्य उपक्रमामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होताना दिसून येत आहे. आतापर्यंत रेन वॉटर हार्वेस्टिंगसाठी ६६३, सौर ऊर्जेचा वापरासाठी २०१३, गांडूळखत निर्मितीसाठी ४८, सांडपाण्याच्या पुनर्वापरासाठी ४३४ नागरिकांना आपल्या सामान्य करामध्ये सवलत प्राप्त झाली आहे.नवीन बांधकाम करताना आता रेन वॉटर हार्वेस्टिंग करणे बंधनकारक आहे. बांधकामाचा नकाशा मंजूर करताना आर्किटेक्टकडून रेन वॉटर हार्वेस्टिंगचे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. याशिवाय मोकळे भूखंड, वापरात नसलेल्या मालमत्ता, रिक्त मालमत्ता याबाबत मालमत्ता धारकाने संबंधित मनपा झोनमध्ये संपर्क साधून कराचे मागणी देयके प्राप्त करावे व मालमत्ता कर नागपूर महानगरपालिकेच्या खात्यात भरावा. मालमत्ता कर नियमावलीमध्ये झालेल्या बदलानुसार नवीन मालमत्ता खरेदी केल्यास, नवीन बांधकाम केल्यास संबंधित झोनमध्ये मालमत्ता कर पुनर्निधारणसंबंधी कार्यवाहीची प्रक्रिया करून घ्यावी, असेही सहायक आयुक्त मिलिंद मेश्राम यांनी सांगितले.

## शहरातील साहित्यिकांचे साहित्य होणार मनपाच्या वाचनालयातून उपलब्ध

### राष्ट्रीय हिंदी दिनानिमित्त मनपाचा पुढाकार : १९ साहित्यिकांनी केली साहित्य सुपूर्द

शहरातील हिंदी साहित्यिकांचे साहित्य मनपाच्या ग्रंथालयामध्ये वाचकांसाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. राष्ट्रीय हिंदी दिनानिमित्त नागपूर महानगरपालिकेतर्फे महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून सोमवारी (ता.१६) शहरातील १९ साहित्यकारांनी आपली १७९ साहित्य महापौर नंदा जिचकार यांच्याकडू सुपूर्द केली.मनपा मुख्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहामध्ये आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर नंदा जिचकार होत्या. यावेळी स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे, गलिच्छ वस्ती निर्मूलन समिती सभापती तारा (लक्ष्मी) यादव, ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, नगरसेविका रूपा राय, नगरसेविका भावना लोणारे, निगम सचिव हरीश दुबे, ग्रंथालय अधीक्षक अलका गावंडे यांच्यासह शहरातील साहित्यिक ओम प्रकाश शिव, नरेंद्र परिहार, डॉ.शशी वर्धन शर्मा शैलेश, सुधा काशिव, मधु शुक्ला, मीरा रामकवार, डॉ.रमेश गांधी, डॉ.कल्पना शर्मा, प्रभा मेहता, कृष्ण कुमार द्विवेदी, डॉ.बालकृष्ण महाजन, विदीशा शर्मा, गुरूप्रताप शर्मा, प्रा.रवी कोलते, माधुरी राउळकर तसेच शंकर विटनकर यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.यावेळी उपस्थित सर्व मान्यवर साहित्यिकांनी आपले साहित्य मनपाच्या ग्रंथालयातून वाचकांना उपलब्ध करुन देण्यासाठी महापौर नंदा जिचकार यांच्याकडे सुपूर्द केले.

## अग्निशमन विभागाची सेवन-डे उच्च माध्यमिक शाळेत मॉक ड्रील

आपात्कालिन परिस्थितीत शाळेतील विद्यार्थ्यांनी सतर्क राहावे व त्यांना अशा परिस्थितीशी सामना करता यावा यासाठी महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत सिव्ही्ल लाईन्स येथील सेवन–डे माध्यमिक शाळा येथे नुकतेच फायर मॉक ड्रील व ईव्हॅकेशन ड्रीलचे आयोजन करण्यात आले.आपातकालिन परिस्थितीत शाळेतील विद्यार्थ्यांनी कोणती काळजी घ्यावी, आपात्कालीन जिन्याने कसे बाहेर यावे याचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी प्रात्यक्षिक व कवायतींद्वारे विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. मनपाचे प्रमुख अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके यांच्या मार्गदर्शनात ही मॉक ड्रील आयोजित करण्यात आली. यावेळी प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे सहा स्थानानिधाकारी केशव कोठे, संदीप शिवनकर यांनी मॉक ड्रीलच्या कवायतींचे आयोजन केले होते. यावेळी सेवन–डे माध्यमिक शाळेचे प्राचार्य संतोष अडसूड यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षिका व २५० विद्यार्थी उपस्थित होते.

# प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेच्या लाभासाठी मनपाच्या ३२ प्रा.आ.केंद्रातून ई-कार्ड वितरणाची व्यवस्था ३२ हजारांवर लाभार्थ्यांना कार्ड वाटप

आरोग्य सेवेचा लाभ गरीब रुग्णांना मिळण्याकरिता आणि आपत्तीजनक आरोग्यासाठीच्या खर्चापासून लोकांना संरक्षण मिळावे यासाठी केंद्र सरकारतर्फे सुरू करण्यात आलेल्या प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना ई–कार्ड वितरणाची व्यवस्था मनपाच्या ३२ प्राथमिक आरोग्य केंद्र आणि हेल्थ पोस्टमध्ये नि:शुल्क करण्यात आली आहे. ई–कार्ड वाटप १२३ सिटीझन सर्व्हिस सेंटरमार्फत सुरू आहे. यासाठी प्रति व्यक्ती ३० रुपये शुल्क आकारले जाते. मात्र, नागपूर महानगरपालिकेने सुरू केलेल्या ई–कार्ड वितरणासाठी कुठलेही शुल्क आकारले जात नसल्याची माहिती मनपाच्या आरोग्य उपसंचालक डॉ. भावना सोनकुसळे यांनी दिली. लाभार्थ्यांनी या लाभाकरिता पात्र आहे किंवा नाही याबाबतची माहिती जवळच्या आरोग्य केंद्राला प्रत्यक्ष भेट देऊन जाणून घेता येईल अथवा र्हीीिं://ाशीर.िक्षिरू.र्सीें.ळप/ाशीलह/श्रेसळप या संकेतस्थळावर भेट देऊनही आपले नाव आहे किंवा नाही हे जाणून घेता येईल. १४५५५/१८००१११५६५ या टोल फ्री क्रमांकावरही संपर्क साधून माहिती जाणून घेता येईल, असे डॉ. भावना सोनकुसळे यांनी सांगितले. प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेत नागपूर महानगर क्षेत्रात २३ खासगी व शासकीय रुग्णालये सेवा देणार असून यामध्ये १३०० आजारांकरिता पाच लाखा रुपयांपर्यंत मोफत उपचार देण्याची सुविधा उपलब्ध आहे. या योजनेअंतर्गत सन २०११ च्या जातीनिहाय, सामाजिक, आर्थिक जनगणनेमधील काही निकषांवर आधारीत लाभार्थ्यांना दरवर्षी प्रती कुटुंबासाठी पाच लाखांपर्यंतचे आर्थिक कवच विमारूपाने उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये नोंदणी व बेड शुल्क, नर्सिंग व बोर्डिंग शुल्क, सर्जन, भूलतज्ज्ञ, वैद्यकीय आणि सल्लागार फी, रक्त संक्रमण, ऑपरेशन शुल्क, शस्त्रक्रिया उपकरणांची किंमत, औषधे, इम्प्लान्टर्स, पॅथॉलॉजी, रेडिओलॉजी, एमआयआर, सिटीस्कॅन, सोनोग्राफी, डिस्चार्जनंतर १५ दिवसांपर्यंत चाचणी औषध आदींचा समावेश असल्याची माहिती त्यांनी दिली. महानगरपालिकेअंतर्गत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसाठी एकूण पात्र लाभार्थी २,१९,७७० आहेत. त्यापैकी आजपर्यंत ४२५०६ लाभार्थ्यांचे ई–कार्ड तयार झालेले आहे. उर्वरितांनी त्वरित जवळच्या महानगरपालिका आरोग्य केंद्राशी संपर्क साधून आपले नाव तपासून घ्यावे. असल्यास राशन कार्ड, निवडणूक ओळखपत्र, पॅनकार्ड, आधारकार्ड किंवा कुठलेही शासकीय ओळखपत्र दाखवून ई–कार्ड तातडीने तयार करून घ्यावे, असे आवाहन नागपूर महानगरपालिकेच्या वतीने आरोग्य उपसंचालक डॉ. भावना सोनकुसळे यांनी केले आहे.